(53)

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस ठाणे सोयगाव ता सोयगांव जि औरंगाबाद (ग्रा.) सत्यमेव जयते

# FIRST INFORMATION REPORT

## (Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): औरंगाबाद ग्रामीण  **P.S.**(ठाणे): सोयगांव

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0130  **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/07/2023 18:21

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार  **Date From** (दिनांक पासून): 07/07/2023

**Time Period** (कालावधी): पहर 4  **Date To** ( दिनांक पर्यंत): 07/07/2023

**Time From** (वेळेपासून): 12:49 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 12:49 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 07/07/2023  **Time** (वेळ): 18:13 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 019

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/07/2023 18:13 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 2 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पंचायत समीती सोयगाव,सोयगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश्वर भगवान गाडेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आमखेडा, सोयगाव ,सोयगांव,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आमखेडा, सोयगाव ,सोयगांव,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8055491693

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन नानासाहेब रोठे | पद-सहाय्यक तांत्रीक अधिकारी | | 1. पंचायत समीती कार्यालय सोयगाव,सोयगाव ,सोयगांव, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 07/07/2023

मी ज्ञानेश्वर भगवान गाडेकर, वय-31 वर्ष, व्यवसाय शेती, रा.आमखेडा, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद मो.क्र. 8055491693, 9518780375.
समक्ष पोलीस ठाणे स्टेशन सोयगाव, जि.औरंगाबाद येथे हजर राहुन फिर्याद देतो की ,मी दिनांक 07/07/2023 राजी दोन शासकीय पंचा समक्ष लाच मागणीची तक्रार दिली की,
मी वरील प्रमाणे असुन शेती व्यवसाय करुन माझ्या कुटुंबाचा उदनिर्वाह करतो, माझे शिक्षण 5 वी पर्यंत झालेले असुन मला लिहीता / वाचता येत नाही. मी फक्त माझी स्वाक्षरी करु शकतो.
मी आज रोजी जंगला गाव , ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे समक्ष हजर येऊन तक्रार देतो की, माझे नावे रावेरी शिवार, गट नं.51 मध्ये असलेल्या शेत जमीनीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन-2021-2022 मध्ये विहीर मंजुर झाली होती. सदर विहीरीचे काम पुर्ण झालेले असुन झालेल्या विहीरीचे कामाचे बील मंजुरी बाबत मी दिनांक 05/07/2023 रोजी पंचायत समीती कार्यालय, सोयगाव येथे जाऊन रोठे इंजिनीयर यांना भेटलो त्यावेळी रोठे इंजिनीयर यांना मी माझे विहीरीचे मजुरीचे कामाचे बिल मस्टर प्रमाणे मंजुर करुन देण्याची विनंती केली असता रोठे इंजिनीयर यांनी माझ्याकडे माझे विहीरीचे मजुरीचे बिल मंजुर करण्याकरीता प्रती मस्टर 1000/- रुपये प्रमाणे पाच मस्टरचे एकुण 5000/- रुपये लाचेची मागणी केली आहे.
मला रोठे इंजिनीयर यांना लाच देण्याची इच्छा नाही श्री. रोठे व माझा कोणताही पैसे देणे घेणेचा व्यवहार नाही. व रोठे साहेब व माझी कोणतीही दुशमनी किंवा वैर नाही.
श्री. रोठे इंजिनीयर यांनी मला आज पंचायत समीती कार्यालय येथे भेटण्यासाठी बोलावले आहे. त्यावेळी रोठे इंजिनीयर यांनी माझे विहीरीचे मजुरीचे बिला करीता माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी हि विनंती.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेल्या तक्रार उपस्थित असलेले त्यांच्या सोबतचे दोन शासकीय पंचास वाचण्यास दिली पंचानी ती तक्रार वाचल्या नंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधिक्षक संगीता पाटील यांनी समक्ष म्हणुन सही केली.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने प्रथम लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय माझे व पंचांचे संमतीने घेतला. त्या प्रामणे लाचमागणी पडताळणी संदर्भात पोलीस उप अधिक्षक संगीता पाटील यांनी मला व पंचास तसेच पथकातील सदस्यांना आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर श्री.रोठे इंजिनीयर यांनी मला आज रोजी पंचायत समीती सोयगाव येथे भेटण्याकरीता बोलवले असल्याने पंचायत समीती कार्यालय सोयगाव येथे जाऊन व रोठे इंजिनीयर याची भेट घेऊन पंचा समक्ष लाचेची पडताळणी करण्याकरीता माझ्या कडे सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर देऊन मला व माझ्या सोबत पंच श्री.चव्हाण यांना 11.40 वा. जंगला गाव येथील सुरक्षीत ठिकाणावरुन माझ्याकडील मोटार सायकल ने रवाना केले त्यानंतर मी व पंच श्री. चव्हाण असे पंचायत समीती सोयगाव कार्यालयात येवुन श्री.रोठे इंजिनीयर यांची भेट घेतली व मी रोठे यांना माझे विहीरीचे मजुरीचे बिल मस्टर प्रमाणे मंजुर करण्याची विनंती केली व सर माझे काम करुन टाका असे बोललो असता रोठे हे मला सगळयांचे सारखे घ्यायचे अन तुझे कमी घ्यायचे असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा साहेब मी गरीब माणुस आहे असे म्हणाले तेव्हा रोठे हे ठिक है, किती देतो ? असे म्हणलाले.त्यावर मी रोठे साहेबांना तुम्ही सांगाना किती असे म्हणालो त्यावर रोठे साहेब है तुला काय दयायचे ते देऊनटाक असे म्हणाले त्यावर मी रोठे यांना मी काय म्हणतो चार हजार रुपये चालेल ना असे म्हणलो असता रोठे यांनी हो चालेले असे म्हणुन होकार दिला व माझ्या विहीरीचे मजुरीचे बिल मंजुर करण्या करीता प्रती मस्टर 1000/- रुपये असे पाच मस्टरचे एकुण 5000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 4000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले व लाचेची

रक्कम लगेचच पंचायत समीती कार्यालय, सोयगाव येथे घेऊन येण्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच श्री.चव्हाण असे सापळा पथक थांबलेल्या ठिकणी परत आलो तेथे पो.अंम.श्री.चव्हाण यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला. त्यानंतर पो.उप.अधीक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता सदर संभाषणामध्ये श्री.रोठे इंजिनीयर यांनी माझ्याकडे केलेल्या लाचमागणी बाबत त्यांची खात्री झाली. त्यानंतर श्रीमती पाटील मॅडम यांनी मला लाच देण्याकरीता आवश्यक असलेल्या रक्कमे बाबत विचारणा केली असता मी माझ्याकडील 4000/- रुपये ज्यात 500 रुपये दराच्या 8 चलनी नोटा पोउपअधी पाटील मॅडम यांच्या ताब्यात दिल्या सदर नोटा असलेली लाचेची रक्कम रोठे इंजिनीयर यांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे पंचा समक्ष देऊन सापळा कारवाई करण्याचा निर्णय पो.उप.अधी. पाटील मॅडम यांनी माझे व पंचाचे संमतीने घेतला. त्यानंतर पोउपअधी श्रीमती संगीता पाटील यांनी मला, सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात सुचना दिल्या व सापळा कारवाईमध्ये नोटांना लावण्यात येणाऱ्या ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगीतले व त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले.त्यानंतर पोउपअधी पाटील मॅडम यांच्या सुचने वरुन पोना वाघ व पंच श्री.एजाज अली यांनी सदर नोटांचे नंम्बर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले व सदर नोटांना ॲथ्रासिन पावडर लाऊन नोटा माझ्या पँटचे उजव्या बाजुच्या समोरच्या खिशात ठेवल्या व व्हॉइस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन सदर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिले. तसेच रोठे इंजिनीयर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझ्या डोक्यावर माझा डावा हात फिरवुन लाच स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजित ईशारा करण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री चव्हाण व पो.ना.श्री.वाघ असे माझे मोटार सायकलवर पंचायत समीती कार्यालय, सोयगाव कडे 12.29 वा. रवाना झालो आमचे पाठोपाठ पो.उप.अधी. श्रीमती पाटील मॅडम , पंच क्र.2 श्री.एजाज अली असे व पो.अंम.विलास चव्हाण असे पंचायत समीती कार्यालय, सोयगाव चे परीसरामध्ये येऊन दबा धरुन थांबले. मी व पंच श्री.चव्हाण असे पंचायत समीती कार्यालयामध्ये जाऊन रोठे इंजिनीयर यांची भेट घेतली व तेथे थोडावेळ रोठे यांचेशी चर्चा केली त्यावेळी मी रोठे इंजिनीयर यांना तुम्ही सांगीतलेले ते 4000/- रुपये आणले सर घ्या मोजुन असे म्हणुन लाचेची रक्कम माझ्या उजव्या हाताने बाहेर काढुन रोठे यांचे समोर धरली असता रोठे इंजिनीयर यांनी त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांचे पँटचे समोरील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी माझा डावा हात माझे डोक्यावर फिरवुन सापळा पथकास दिसेल अशा रितीनी लाच स्विकारले बाबतचा इशारा केला. ती वेळ 12.49 ची होती त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच क्र.2 असे सदर घटनास्थळी आले.

त्यानंतर सापळा पथकाने रोठे इंजिनीयर यांना ताब्यात घेतले त्यानंतर पो.उप.अधी. पाटील मॅडम यांचे सुचनेवरुन आलोसे श्री रोठे यांनी त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिशातुन स्विकारलेली लोचची रक्कम 4000/- रुपये स्वत:चे हाताने काढुन आमचे सर्वा समक्ष धरली ती पंच क्र.2 श्री.एजाज अली यांनी हस्तगत केली व त्यांचेकडे असलेला नोटांचे क्रमांक लिहीलेला कागदावरील नोटांचे क्रमांक व आलोसे रोठे यांचे कडुन ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहीले असता सदर नोटा सारख्याच असल्याची सापळा पथकाची खात्री झाली.

त्यानंतर श्री.रोठे, इंजीनीयर यांना पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी स्वत:चा परिचय देवुन त्यांना त्यांचे संपुर्ण नाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सचिन नानासाहेब रोठे, वय-30 वर्ष, व्यवसाय नौकरी पद-सहायक तांत्रीक अधिकारी, (कंत्राटी), पंचायत समीती कार्यालय, सोयगाव,जि.औरंगाबाद रा.शेंदुर्णी रोड, जोगेश्वरी नगरी, सोयगाव ता.औरंगाबद मुळ रा.दहेगाव पालखेड रोड, दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालयाच्या पाठीमागे, नविन रायगाव, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद सांगीतले.

करीता आज दिनांक 07/07/2023 रोजी आरोपी लोकसेवक सचिन नानासाहेब रोठे, वय-30 वर्ष, व्यवसाय नौकरी पद-सहायक तांत्रीक अधिकारी, (क्रत्राटी), पंचायत समीती कार्यालय, सोयगाव,जि.औरंगाबाद रा.शेंदुर्णी रोड, जोगेश्वरी नगरी, सोयगाव ता.औरंगाबद मुळ रा.दहेगाव पालखेड रोड, दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालयाच्या पाठीमागे, नविन रायगव्हाण, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद यांनी माझे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या व काम पुर्ण झालेल्या विहीरीचे मजुरीचे बिल मंजुर करण्यासाठी पंच साक्षीदारा समक्ष माझ्याकडे प्रती मस्टर 1000/- रुपये प्रमाणे पाच मस्टरचे एकुण 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 4000/- रुपये लाचेची रक्कम पंचायत समीती कार्यालय, सोयगाव येथे स्विकारली म्हणुन माझी सचिन नानासाहेब रोटे यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मला वाचुन दाखवली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
RAVINDRA Kachru MHASKE
**Rank (**पद**):** HC (Head Constable) **No.(**क्र.**):** POBN66928
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**
ज्ञानेश्वर शाळे

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे. ...गांव

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** anmol vinayak keda
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** api